ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 11 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दीड वर्षांच्या चिमुरड्याला 27 सेकंदात 8 वेळा रस्त्यावर आपटून मारलं





पान 3 वरुन...

बालाजीनगरला दिलासा; डॉ. सुहास कांबळेंची प्रत्यक्ष पाहणी

### पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काढणार मोर्चा

# 'कॉकरोच' आंदोलन संसदेवर धडकणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संसदेत चर्चा व्हावी, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करावी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) च्या वतीने २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढण्यात येणार आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हा मोर्चा आयोजित करण्यात आला असून, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे या आंदोलनाचे नेतृत्व असणार आहे.**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाचा आज १३ वा दिवस असून, सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीत खालावलेपणा आल्याचे सांगण्यात येत आहे. उपोषणादरम्यान त्यांचे सुमारे सात किलोहून अधिक वजन घटल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे.


'सीजेपी'चे नेते अभिजीत दिपके यांनी सांगितले की, दिल्लीतील मुसळधार पावसातही विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, आंदोलनस्थळी ताडपत्री किंवा तंबू उभारण्यास दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारल्याचा आरोप त्यांनी केला. तरीही देशभरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दूरध्वनीवरून सोनम वांगचुक यांची प्रकृतीची विचारपूस केली. तसेच पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी जंतर-मंतर येथे भेट देत आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला.

यावेळी अरविंद सावंत यांनी नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे सांगत, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांचा लढा न्याय्य असून, त्यांच्या प्रश्नांवर संसदेत गंभीर चर्चा होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.







### उद्धव ठाकरेंकडून सोनम वांगचुक यांची दूरध्वनीवरुन विचारपूस

नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने पाठिंबा दर्शविला आहे. पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी गुरुवारी आंदोलनस्थळी भेट देऊन प्रसिद्ध पर्यावरणवादी आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि अभिजीत दिपके यांच्यासह अन्य आंदोलनकर्त्यांशीही त्यांनी चर्चा केली. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही दूरध्वनीवरून वांगचुक यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

### २० जुलैला संसदेवर विद्यार्थी मोर्चा; आंदोलन आणखी तीव्र होणार

नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा या प्रमुख मागण्यांसाठी 'कॉकरोच जनता पार्टी'च्या वतीने २० जुलै रोजी संसदेवर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हा मोर्चा आयोजित करण्यात आला असून, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील विद्यार्थी, युवक आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संसदेत सविस्तर चर्चा व्हावी, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या उपोषणाला विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांचा पाठिंबा मिळत असून, या मोर्चामुळे संसदेच्या पहिल्याच दिवशी राजधानीतील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# रक्षकच बनले भक्षक, महिलेवर अत्याचार

## पोलीस भरतीत अधिक गुण देण्याचे आमिष, PSI सह कॉन्स्टेबलवर गुन्हा दाखल

**महाईन्यूज । पुणे**

**पोलीस भरती आणि बँड्समन भरती परीक्षेत अधिक गुण मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार बारामती तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य राखीव पोलिस दलातील पोलीस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार आणि मुंबई बँड पोलीस दलातील कॉन्स्टेबल मारुती करे यांच्याविरुद्ध बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अमरनाथ कुंभार हा दौंड येथील राज्य राखीव पोलRस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहे. तर मारुती करे हा मुंबई बँड पोलीस दलात कॉन्स्टेबल आहे. दोन्ही आरोपींनी पोलीस भरती प्रक्रियेत मदत करण्याचे आश्वासन देत पीडित महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

पीडित महिलेने सुरुवातीला पोलिसांकडे तक्रार दिली होती. मात्र योग्य दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत तिने न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिल्यानंतर बारामती ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यान्वये दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

दरम्यान, गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवूनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप पीडितेने केला आहे. आरोपींना तातडीने अटक न केल्यास पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही तिने दिला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बारामती ग्रामीण पोलीस करत आहेत.

"मी 2022 पासून पोलीस भरतीची तयारी करत होते. 2024-25 मध्ये मला माहिती मिळाली की, बँड्समन पदाबाबतही भरती निघते. त्या पदासाठी मी अर्ज केला होता. मला त्याबाबत काही माहिती नव्हती. त्यावेळी मला एका मैत्रिणीकडून बँड पोलीस कॉन्स्टेबल मारुती करे सर यांचा फोन नंबर मिळाला. मी त्यांना फोन केला. मी त्यांचा क्लास जॉईन केला. मी रेग्यूलर क्लासला जाऊ लागले", असं पीडिता म्हणाली.

"एकेदिवसी क्लास चालू असताना क्लासमध्ये पोलीस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार सर आले. तिथे आमची ओळख झाली. आठ दिवसांनी करे सर म्हणाले की, तुम्हाला भेटायला कुंभार सर आले आहेत. त्यांना भेटुयात. मी त्या गोष्टीला विरोध केला. पण तरीही त्यांनी मला वारंवार भरतीचा प्रेशर करुन नेलं", असं पीडितेने सांगितलं.

"मी त्यांना बोलले की, इथे फ्लॅटखालीच बोला. पण ते बोलले इथे नको. इथे लोकं बघत आहेत, वरती चला. त्यामुळे आम्ही तिघेजण फ्लॅटमध्ये गेलो. त्यावेळी करे सर थंडा आणण्याचं कारण देऊन निघून गेले. कुंभार सरांनी दार लावलं. मी त्यांना रोखलं. त्यांनी घाबरु नको असं म्हणत पाणी दिलं. ते पाणी दिल्यानंतर मला चक्कर येऊ लागले. मी म्हटलं की, मला घरी जायचं आहे. पण त्यांनी माझ्यावर लैंगिक अत्याचार केला. पाऊण तासांनी करे सर आले. त्या दोघांनी मला धमकी दिली की, तू कुणाला सांगितलं तर तुला भरती होऊ देणार नाही", असा आरोप पीडितेने केला आहे.

### कोर्टाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल

"मी पोलीस प्रशासनाकडे 8 एप्रिल 2026 पासून जात आहे. पण तिथे माझी कुणीच दखल घेतली नाही. सर्व गोष्टींची टाळाटाळ चालू होती. 14 एप्रिलला माझा फक्त तक्रार अर्ज घेतला. शेवटी मी कोर्टात धाव घेतली. त्यानंतर कोर्टाच्या आदेशानुसार, 5 जुलैला दोघांवर गुन्हा दाखल झाला. पण अजूनही त्यांना अटक करण्यात आलेली नाही", अशी खंत पीडीतेने व्यक्त केली.

# पुणे महापालिकेच्या स्वागत फलकावरून उपमुख्यमंत्री, पालकमंत्री गायब!

**महाईन्यूज । पुणे**

**संतांनी दिलेला समता, बंधुता, सेवा आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महापौर मंजूषा नागपुरे यांच्या पुढाकारातून महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेला 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' हा उपक्रम वादात सापडला आहे. या बाबतच्या पत्रक, जाहिरात फलकांवर केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच स्थान दिल्याचे समोर आले.**




> महापालिकेचा जाहिरात फलकांवर दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांची छायाचित्रे तसेच नाव टाकणं आवश्यक होते. ही चूक झालेली आहे. मात्र हे जाणीवपूर्वक केलेले नाही. स्वागत फलकांवर फोटो नाही, हे आमच्या उशिरा लक्षात आले. संबधितांना या बाबत समज देण्यात आली आहे.
>
> **- मंजूषा नागपुरे, महापौर.**

शहरात पुणे महापालिकेच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या स्वागतासाठी जागोजागी उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांवर उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या छायाचित्रांना स्थान देण्यात आलेले नाही. शहरातील विविध महत्त्वाच्या रस्त्यांवर तसेच चौकांमध्ये महापालिकेच्या माध्यमातून हे स्वागत फलक लावण्यात आलेले आहेत.

महापालिकेच्या वतीने झालेल्या या चुकीबाबत विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी नाराजी व्यक्त केली. महापालिकेच्या वतीने स्वागतासाठी जाहिरात फलक लावले जात असताना त्यामध्ये दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्र्यांच्या छायाचित्रांना स्थान न देता महापौर नागपुरे यांनी राजशिष्टाचार पाळला नसल्याची टीका निकम यांनी केली. 'सेवा वारी' म्हणत महापौर राजकारण करीत असल्याचे निकम म्हणाले.

राज्यात भाजपबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष, शिवसेना (शिंदे) पक्ष सत्तेत आहे. त्यामुळे या विषयावर भाजपच्या जेष्ठ नेत्यांनी महापौरांना समज देऊन त्यांच्याकडून स्पष्टीकरण घ्यावे अशी मागणी निकम यांनी केली आहे. महापौर नागपुरे यांच्याकडून अनेकदा दुजाभाव दिला जातो. वारंवार मागणी करू देखील त्या दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे.

महापालिकेने यंदा आषाढी वारीच्या निमित्ताने 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' हा उपक्रम राबविला आहे. या अंतर्गत वारकरी भाविकांसाठी पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळांवर स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तात्पुरती स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, प्रकाश व्यवस्था, अग्निसुरक्षा, आपत्कालीन प्रतिसाद पथके, नियंत्रण कक्ष अशा सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पुणे शहरात मुक्कामी असल्याने त्यांच्या स्वागतामध्ये तसेच त्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोयी सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये यासाठी सर्वपक्षीय सभासद काम करत आहेत. महापौर या शहराच्या प्रथम नागरिक असतात. त्यांना विविध विषयांवर सर्वाधिकार दिले जातात. मात्र केवळ बहुमत आहे आणि आपल्याला बोलणारे कोणी नाही. चुकीचे काम केले तरी चालून जाते, असे महापौर नागपुरे यांना वाटत असेल तर असे चुकीचे पायंडे कदापी खपवून घेतले जाणार नाही. याबाबत पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि नेत्यांकडे देखील तक्रार केली जाणार असल्याचे विरोधी पक्ष नेते निकम यांनी स्पष्ट केले.

# पुनावळेतील डेपो रद्द; मोशी दुर्घटनेची बीजे तेव्हाच पेरली?

## राजकीय विरोधामुळे डेपोचा प्रस्ताव रद्द झाल्याची चर्चा; शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पुनावळे येथे प्रस्तावित कचरा डेपोचे आरक्षण राजकीय विरोधामुळे रद्द करण्यात आल्याने आजची परिस्थिती ओढवल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. पुनावळे येथे दुसरा कचरा डेपो झाला असता, तर मोशी डेपोवरील ताण कमी झाला असता आणि पर्यायी जागा शोधण्याची वेळ प्रशासनावर आली नसती, असे मत व्यक्त केले जात आहे.**



शहरात दररोज सुमारे १,५७९ टन कचरा निर्माण होतो. हा संपूर्ण कचरा १९९१ पासून मोशी येथील डेपोमध्ये टाकला जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कचऱ्याचे प्रमाण सातत्याने वाढत असून मोशी डेपोवर मोठा ताण निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेने २००८ मध्ये पुनावळे येथील सुमारे २२.८ हेक्टर वन विभागाच्या जागेवर कचरा डेपोचे आरक्षण प्रस्तावित केले होते.

मात्र, कालांतराने पुनावळे परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाल्यानंतर नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी या प्रस्तावाला विरोध केला. आंदोलनानंतर विकास आराखड्यातून कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यात आले. त्याऐवजी त्या जागेवर व्यावसायिक गाळे आणि कन्व्हेन्शन सेंटरसाठी आरक्षण ठेवण्यात आले.

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड शहरासोबतच देहूरोड आणि खडकी कटक मंडळ हद्दीतील कचराही मोशी डेपोमध्येच टाकला जात आहे. या कचऱ्याच्या विल्हेवाटीपोटी महापालिकेला महसूल मिळत असला, तरी डेपोवरील ताण सातत्याने वाढत आहे.

मोशी डेपो दुर्घटनेनंतर कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांचा मार्ग बंद झाल्याने प्रशासनासमोर कचरा साठवण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात कचरा साठवण्याची व्यवस्था केली जात असून, उर्वरित भागांसाठी जागेचा शोध सुरू आहे.

दरम्यान, वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर शहराला नव्या कचरा डेपोची गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी व्यक्त केले आहे. पुनावळे येथील आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अन्यथा भविष्यात कचरा व्यवस्थापनाची समस्या अधिक गंभीर होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### देहूरोड, खडकीतील कचराही मोशीतच

संपूर्ण शहराबरोबरच देहूरोड आणि खडकी कटक मंडळाच्या हद्दीतील कचराही मोशी डेपोतच टाकला जात आहे. गेल्या काही वर्षांपासून दोन्ही कटक मंडळाच्या हद्दीतील कचरा येथे आणला जात आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावल्यापोटी महापालिकेला पैसे मिळत आहेत.

### पुनावळे डेपो रद्द; मोशीवर वाढला भार

महापालिकेने २००८ मध्ये पुनावळे येथे २२.८ हेक्टर जागेवर कचरा डेपोचे आरक्षण प्रस्तावित केले होते. मात्र, नागरिकांच्या विरोधानंतर हे आरक्षण रद्द करण्यात आले. सध्या शहरासह देहूरोड आणि खडकी कटक मंडळाचा सर्व कचरा मोशी डेपोवरच टाकला जात असून, मोशी दुर्घटनेनंतर पर्यायी डेपोची गरज अधिक तीव्रतेने समोर आली आहे.

# अडकलेल्यांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न; आयुक्तांचा विश्वास



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर सुरू असलेल्या बचाव मोहिमेदरम्यान पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देऊन इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद साधला. या कठीण प्रसंगी प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून अडकलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुखरूप बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

यावेळी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी बचावकार्याची माहिती देताना सांगितले की, महापालिकेच्या सर्व विभागांसह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), भारतीय सेना, अग्निशमन विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणा पूर्ण समन्वयाने अखंड बचावकार्य करत आहेत. उपलब्ध मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि तांत्रिक साधनांचा वापर करून प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

"बचावकार्य पूर्ण होईपर्यंत धीर ठेवा. प्रशासन प्रत्येक क्षणाची माहिती देत असून अडकलेल्या व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत," असा दिलासाही त्यांनी नातेवाईकांना दिला.

घटनास्थळी थांबलेल्या नातेवाईकांच्या भोजन, निवास व इतर आवश्यक सुविधांची तातडीने व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी अँटनी अँड लारा कंपनीच्या व्यवस्थापनाला दिले.

दरम्यान, एनडीआरएफचे सेकंड कमांड दीपक तिवारी यांनी बचाव मोहिमेची तांत्रिक माहिती नातेवाईकांना दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### बचावासाठी सर्व यंत्रणा सज्ज

मोशी दुर्घटनास्थळी एनडीआरएफ, भारतीय सेना, अग्निशमन दल, पोलीस आणि महापालिकेच्या सर्व यंत्रणा संयुक्तपणे युद्धपातळीवर बचावकार्य करत आहेत. अडकलेल्या प्रत्येक नागरिकाला सुखरूप बाहेर काढण्यासाठी उपलब्ध सर्व मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि तांत्रिक साधनांचा वापर करण्यात येत आहे.

### नातेवाईकांसाठी विशेष व्यवस्था

मोशी दुर्घटनेनंतर घटनास्थळी थांबलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संवाद साधून प्रशासन त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला. तसेच नातेवाईकांच्या भोजन, निवास आणि इतर आवश्यक सुविधांची तातडीने व्यवस्था करण्याचे निर्देश संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनाला दिले.





## भूमिका

# शेतकऱ्याच्या कारभारणीला स्थान, हक्क आणि प्रतिष्ठा

**महाराष्ट्र सरकारने संमत केलेला महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ हा ग्रामीण महिलांच्या सन्मानाचा आणि कृषी क्षेत्रातील सामाजिक न्यायाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. शेतीच्या प्रत्येक कामात खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या महिलांना आजवर केवळ 'शेतकऱ्याची पत्नी' किंवा 'कुटुंबातील सदस्य' अशीच ओळख मिळत होती.**



प्रत्यक्षात पेरणी, खुरपणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडूनही त्यांना अधिकृतपणे 'शेतकरी' म्हणून मान्यता नव्हती.

नव्या कायद्याने ही दीर्घकालीन विसंगती दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील कृषी क्षेत्रात महिलांचा मोठा सहभाग असूनही त्यांच्या नावावर जमिनीचे प्रमाण अत्यल्प आहे.

त्यामुळे किसान क्रेडिट कार्ड, पीक विमा, कृषी कर्ज, अनुदाने आणि विविध शासकीय योजनांचा लाभ अनेक महिलांना मिळत नव्हता.

नव्या कायद्यामुळे जमिनीची मालकी नसतानाही प्रत्यक्ष शेती करणाऱ्या, भूमिहीन, बटाईदार, शेतमजूर, हंगामी महिला कामगार तसेच पशुपालन व दुग्धव्यवसायाशी संबंधित महिलांनाही 'महिला शेतकरी' म्हणून कायदेशीर मान्यता मिळणार आहे. ग्रामसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळणारे महिला शेतकरी प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांचे प्रभावी साधन ठरेल.

महिलांना शेतकरी म्हणून मान्यता मिळाल्याने केवळ आर्थिक लाभ वाढणार नाहीत, तर त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेलाही बळ मिळेल. निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढेल, कुटुंबातील स्थान अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल.

संशोधनातूनही सिद्ध झाले आहे की, महिलांच्या हातात आर्थिक अधिकार आल्यास त्याचा सकारात्मक परिणाम कुटुंबाच्या शिक्षण, आरोग्य आणि पोषणावर होतो. तथापि, या कायद्याचे यश प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि जलद असणे आवश्यक आहे.

बँका, कृषी विभाग आणि इतर यंत्रणांनी या प्रमाणपत्रांना तातडीने मान्यता देऊन योजनांचा लाभ प्रत्यक्ष महिलांपर्यंत पोहोचवावा. त्याचबरोबर जनजागृती मोहीम राबवून प्रत्येक पात्र महिलेपर्यंत ही योजना पोहोचविणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम हा केवळ कायदा नसून ग्रामीण स्त्रीच्या कष्टांना मिळालेला न्याय, सन्मान आणि अधिकार आहे. महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल देशातील इतर राज्यांसाठीही मार्गदर्शक ठरू शकते. कृषी विकासाचा पाया अधिक मजबूत करायचा असेल, तर शेतकऱ्याच्या कारभारणीला समान स्थान देणे ही काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

### सुसंवाद

**एका शहरात एक प्रतिष्ठित व्यावसायिक आणि त्याची पत्नी राहत होते. व्यवसायाच्या व्यापामुळे पतीला पत्नीला वेळ देता येत नव्हता. त्यामुळे पत्नी एकाकी आणि नाराज होती.**

एके दिवशी दोघांत जोरदार वाद झाला. पती म्हणाला, "आपला मुलगा वकील झाला तर माझ्या व्यवसायात मदत करेल." त्यावर पत्नी म्हणाली, "नाही, तो डॉक्टर होईल, म्हणजे माझी काळजी घेईल."

दोघेही अजून जन्मालाही न आलेल्या मुलाच्या भविष्यावरून भांडू लागले. वाद इतका वाढला की शेजारी मध्यस्थीसाठी आले. एका सज्जनाने शांतपणे विचारले, "मुलाला काय व्हायचे आहे, हे त्यालाच ठरवू द्या."

हे ऐकताच दोघेही गप्प झाले. कारण त्यांना अद्याप मूलच नव्हते! ही गोष्ट कळताच उपस्थित लोकांनी त्यांच्या अविचारी वादावर हसत तेथून काढता पाय घेतला.

- तात्पर्य : **भविष्यातील काल्पनिक गोष्टींवर वाद घालण्यापेक्षा वर्तमानातील समस्या संवादाने सोडवणे अधिक शहाणपणाचे असते.**

महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार यांचे नाव दीर्घकाळ दूरदृष्टी, संयम आणि राजकीय डावपेचांचे प्रतीक राहिले आहे. मात्र आज त्यांच्याच पक्षासमोर अस्तित्व, स्वाभिमान आणि सत्तेच्या समीकरणांचा कठीण प्रश्न उभा ठाकला आहे.

# पवारांचा पक्ष चौकात; सत्तेचा मार्ग की संघर्षाची वाट?



दहा आमदार आणि आठ खासदार असलेला पक्ष सत्तेच्या जवळ जाण्याचा मार्ग स्वीकारावा की विरोधी राजकारणातून स्वतःची स्वतंत्र ओळख जपावी, या द्विधा मनःस्थितीत असल्याचे चित्र दिसते.

पक्षातील काही नेत्यांना सत्तेत सहभागी झाल्यास मतदारसंघाचा विकास, निधी आणि प्रशासनातील कामे अधिक प्रभावीपणे करता येतील, असे वाटते. तर दुसरा गट संघर्षाची भूमिका कायम ठेवण्याच्या बाजूने आहे. त्यांच्या मते, अल्पकालीन सत्तेपेक्षा दीर्घकालीन राजकीय विश्वास अधिक महत्त्वाचा आहे. शरद पवार स्वतःही पक्ष टिकवण्यावर आणि स्वबळाची राजकीय ओळख कायम ठेवण्यावर भर देत असल्याचे संकेत मिळत आहेत.

भाजपसोबत जाण्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले असले, तरी असा निर्णय केवळ सत्तेच्या समीकरणांवर अवलंबून असणार नाही. मतदारसंघातील सामाजिक आणि राजकीय वास्तव, पक्षाची विचारधारा आणि भविष्यातील राजकीय संधी यांचा विचार करूनच अंतिम भूमिका ठरेल.

त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांपेक्षा प्रत्यक्ष निर्णय अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. आज पवारांच्या पक्षासमोर सत्ता, संघर्ष, स्वाभिमान आणि अस्तित्व हे चार पर्याय उभे आहेत. जवळचा सत्तेचा मार्ग आकर्षक वाटत असला, तरी दीर्घकालीन राजकारणात स्वतंत्र भूमिका आणि जनाधार टिकवणे हे अधिक आव्हानात्मक आहे. कोणताही निर्णय घेताना पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विश्वास, मतदारांच्या अपेक्षा आणि भविष्यातील राजकीय परिणाम यांचा समतोल साधावा लागेल. राजकारणात वेळच अंतिम निर्णय देते.

त्यामुळे शरद पवारांचा पक्ष आज जरी संभ्रमाच्या टप्प्यावर दिसत असला, तरी पुढील काही महिन्यांत घेतलेले निर्णय महाराष्ट्राच्या राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारे ठरतील. संघर्षाचा मार्ग कठीण असतो, पण अनेकदा इतिहास त्याचीच अधिक दखल घेतो.

## ।। अभंगवाणी ।।



अंतरींची घेतो गोडी ।
पाहे जोडी भावाची ॥१॥

देव सोयरा देव सोयरा ।
देव सोयरा दीनाचा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकणवासियांचा यंदाचा गणेशोत्सव सुसाट

## मुंबई- गोवा महामार्गावरील माणगाव बाह्यवळण रस्ता खुला होणार

**महाईन्यूज । मुंबई**

**गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाह्यवळण मार्गाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली करण्याचे नियोजन असून पनवेल ते झाराप या मुंबई -गोवा महामार्गावरील ४१७ किमी मार्गाचे चौपदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.**



माणगाव बाह्यवळण मार्गाची लांबी ७.५ किलोमीटर असून या मार्गावर तीन उड्डाणपुल आहेत. त्यापैकी एका उड्डाणपुलाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित दोन मोठ्या पुलांची ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. हे दोन्ही पूल ३१ जुलैपर्यंत पूर्ण होतील. माणगाव बाह्यवळण मार्गाची एक बाजू गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

इंदापूर बाह्यवळण मार्ग ३.५ किलोमीटर लांबीचा असून येथील उड्डाणपुलाचे ४० टक्के काम झाले आहे. हा पूल डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल. संपूर्ण बाह्यवळण मार्ग २८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पनवेल ते झारप या ४४९ किलोमीटर लांबीच्या मुंबई- गोवा महामार्गापैकी ४१७ किमी चौपदरीकरण पूर्ण झाले. उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चिपळूण शहरातील उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून ऑगस्टपर्यंत हा पूल वाहतुकीसाठी खुला होईल. संगमेश्वर येथील सोनवी नदीवरील पुलाच्या पोहोच मार्गाची कामेही प्रगतीपथावर आहेत, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधीची चणचण नाही. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा विभागाला केलेली आर्थिक तरतूद तब्बल 62 टक्के मी वाढलेली आहे.



तसेच परशुराम घाटात वारंवार दरडी कोसळण्याच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पूल उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, त्याला लवकरच मंजुरी मिळेल, अशी आशा मंत्री भोसले त्यांनी व्यक्त केली.

### कंत्राटांची लवकरच देयके :

कंत्राटदारांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे १७ हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत. पुरवणी मागण्यांमध्ये १८९५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे कंत्राटदारांची देयके लवकरच दिली जातील. १ कोटीपर्यंतच्या कंत्राटदारांची देयके त्वरीत अदा करण्यासाठी नवी प्रणाली आणतो आहेत. कंत्राटातील ५६ टक्के रक्कम लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी यांना वाटण्यासाठी जाते, हा कंत्राटदारांचा आरोप केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबधीत नसल्याचे मंत्री भोसले म्हणाले.

# पाकिस्तानी गँगस्टरशी नागपुरातून संपर्क; १० संशयित ताब्यात

**महाईन्यूज । नागपूर**

**देशाचा केंद्रबिंदू असलेल्या नागपुरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) गुरुवारी रात्री मोठी कारवाई केली. पाकिस्तानातील संघटित गुन्हेगारी टोळीशी इंटरनेटवरील समाजमाध्यमांवरून संपर्क साधल्या प्रकरणात एटीएसने १० जणांना ताब्यात घेतले आहे. धक्कादायक बाब म्हणजे यात एकट्या नागपुरातील चार, चंद्रपूर जिल्ह्यातील ३ आणि गोंदिया, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यातील प्रत्येकी एकाचा समावेश आहे. एटीएसच्या या कारवाईमुळे संपूर्ण विदर्भात खळबळ उडाली असून मध्य भारतातील संघटित गुन्हेगारी पुन्हा एकदा चर्चेत आल आहे.**




भारतात संघटितपणे गुन्हेगारी करणारी लॉरेन्स बिष्णोईची टोळी कुप्रसिद्ध आहे. त्या प्रमाणे पाकिस्तानमध्ये शहजाद भाटी, राणा उनेन यांची टोळी कुप्रसिद्ध आहे. पाकिस्तानातील सिंध, कराची,लाहोर भागात ही टोळी सक्रिय आहे. नागपूर विभागातून संपर्क साधलेल्या या दहा जणांनी शहजाद भट्टीच्या समाजमाध्यमांवर संदेश पाठवल्याचे आढळले होते. त्यातला संवाद एटीएस तपासून पहात आहे.

शहजाद भट्टीची टोळी इंटरनेटवरील इन्स्टाग्राम सारख्या समाजमाध्यमांवरून संशयितांचा शोध घेते. त्यांना स्वतः संदेश पाठवते. त्यानंतर विश्वास बसताच त्यांना छोटे छोटे टास्क दिले जातात. या बदल्यात काही रक्कम ही टोळी ऑनलाईन माध्यमातून देते.

शहजाद भट्टी आणि राणा उनेनशी संपर्क साधणाऱ्यांनी नेमकी कोणती बेकायदेशीर कामे केली, यात काही दहशतवादी कृत्यांचा समावेश होता का, यात नेमका किती रकमेचा व्यवहार झाला, याचा दहशतवाद विरोधी पथकाकडून तपास केला जात आहे. नागपुर विभागातील नागपूर शहरातील ४, चंद्रपूर जिल्ह्यातील ३ आणि गोंदिया, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यातल्या नेमक्या कोणत्या भागातून यांना ताब्यात घेण्यात आले, या बाबत मात्र एटीएसने अधिकृत माहिती देण्यास असमर्थता दर्शवली. एटीएसच्या या कारवाईमुळे संपूर्ण विदर्भात खळबळ उडाली असून मध्य भारतातील संघटित गुन्हेगारी पुन्हा एकदा चर्चेत आल आहे.

# राजपाल यादवला मोठा झटका!

## ९ कोटींच्या चेक बाऊन्स प्रकरणात ३ महिन्यांचा तुरुंगवास!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**बॉलीवूडमधील प्रसिद्ध विनोदी अभिनेता राजपाल यादव याला चेक बाऊन्स प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. एकूण ९ कोटी रुपयांच्या कर्ज प्रकरणाशी संबंधित ७ वेगवेगळ्या खटल्यांमध्ये न्यायालयाने राजपाल यादवला प्रत्येकी तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी हा निकाल देताना राजपालला तक्रारदार कंपनीला प्रत्येक खटल्यात १.०५ कोटी रुपये देण्याचे आदेश दिले आहेत.**



याशिवाय, न्यायालयाने राजपालला तक्रारदाराला एकूण १,०४,७५,००० रुपये आणि सरकारी तिजोरीत २५,००० रुपये जमा करण्यास सांगितले आहे. तर राजपालची पत्नी राधा यादव हिने देखील प्रत्येक प्रकरणात तक्रारदाराला ५,५१,३८० रुपये द्यावेत, असे आदेश कोर्टाने दिले आहेत. मात्र, अभिनेत्याने आतापर्यंत भरलेली २.२५ कोटी रुपयांची रक्कम अंतिम दंडातून वजा केली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाच्या सततच्या मध्यस्थीनंतरही दोन्ही पक्षांमध्ये तडजोड न झाल्याने न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी २ एप्रिल रोजी या प्रकरणावरील आपला निकाल राखून ठेवला होता. सुनावणी दरम्यान राजपाल यादवने कर्ज फेडण्याच्या बाबतीत वारंवार बदललेल्या भूमिकेबद्दल हायकोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. कोर्टाने म्हटले की, "आम्हाला आमच्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळत नाहीयेत. हमीपत्रात काही वेगळेच म्हटले होते आणि आता तुम्ही काहीतरी वेगळेच सांगत आहात."

सुनावणी दरम्यान व्हर्च्युअली हजर राहिलेल्या राजपाल यादवने भावूक आवाहन करत सांगितले की, त्याला या प्रकरणात आधीच मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. पैसे फेडण्यासाठी त्याला स्वतःची मालमत्ताही विकावी लागली असून त्याने मोठी रक्कम आधीच जमा केली आहे.

राजपाल यादवच्या या आर्थिक आणि कायदेशीर अडचणींची सुरुवात २०१२ मध्ये झाली. दिग्दर्शक म्हणून त्याचा पहिलाच चित्रपट असलेल्या 'अता पता लापता' या सिनेमासाठी त्याने कर्ज घेतले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरल्यानंतर त्याचे कर्ज तब्बल ९ कोटी रुपयांवर पोहोचले. राजपालचे वकील भास्कर उपाध्याय यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजपालने फेब्रुवारी महिन्यात या प्रकरणात २.५ कोटी रुपये जमा केले होते.

ऑक्टोबर २०२५ मध्ये प्रत्येकी ७५ लाख रुपयांचे दोन डिमांड ड्राफ्ट हायकोर्टाच्या रजिस्ट्रार जनरलकडे जमा करण्यात आले होते, परंतु अजूनही मोठी रक्कम देणे बाकी असल्याने अखेर दिल्ली हायकोर्टाने हा कठोर निर्णय घेतला आहे.

### ६ कोटींची ऑफरही नाकारली

तक्रारदार कंपनीच्या वतीने बाजू मांडताना वकील अवनीत सिंग सिक्का यांनी युक्तिवाद केला की, राजपाल यादवने आपला गुन्हा आधीच मान्य केला आहे, त्यामुळे तो आता जबाबदारीतून सुटू शकत नाही. तसेच तुरुंगवासाची शिक्षा भोगल्याने त्याची आर्थिक जबाबदारी संपत नाही. कोर्टाच्या सांगण्यावरून तक्रारदार कंपनी ६ कोटी रुपयांमध्ये अंतिम तडजोड करण्यास तयार झाली होती, मात्र राजपालने ही ऑफर नाकारली. कोर्टाने ३ कोटी रुपयांच्या हप्त्यांचा एक पर्यायही सुचवला होता, पण तो प्रयत्नही निष्फळ ठरला.

## बिन्यामिन नेतान्याहू यांचा इराणला अण्वस्त्र बनवू न देण्याचा पुनरुच्चार करत इशारा

**महाईन्यूज । इस्त्रायल**

**अमेरिका आणि इराण यांच्यात नव्याने संघर्षाची ठिणगी पडली असताना आता इस्रायलने इराणला इशारा दिला आहे. "युद्ध अद्याप संपले नाही", असे इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी इराणला इशारा देताना म्हटले आहे. इस्रायल आवश्यक कारवाईसाठी तयारी करत असल्याचेही नेतान्याहू यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा हल्ले सुरु झाले असताना इस्रायलने नव्याने दिलेल्या धमकीमुळे मध्य पूर्वेत युद्धाचे ढग पुन्हा गडद होऊ लागले आहेत.**



### युद्धाचे सावट गडद

डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील इराणबरोबरची शस्त्रसंधी समाप्त झाल्याची घोषणा करत आता चर्चेला वाव उरला नसल्याचे स्पष्ट केले. चर्चा म्हणजे 'वेस्ट ऑफ टाईम' असल्याचे मत ट्रम्प यांनी व्यक्त केले. त्यानंतर आता इस्रायलच्या नेतान्याहू यांनी इराणाला धमकी वजा इशारा दिला असून, मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे सावट गडद झाले आहे. अमेरिकेने इराणच्या जवळपास ८० ठिकाणांवर हल्ले केल्यानंतर इराणने देखील अमेरिकेच्या बहारीन आणि कुवेत येथील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केले आहे, असे वृत्त आंतरराष्ट्रीय माध्यमांनी प्रसिद्ध केले आहे.

इस्रायली हवाई दलाच्या पदवीदान समारंभात बिन्यामिन नेतान्याहू गुरुवारी बोलत होते. इस्रायली हवाई दलाच्या क्षमता देशाच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या असल्याचे नेतान्याहू यांनी यावेळी नमूद केले. "इराणी नेतृत्व वारंवार भूमिका बदलून धक्का देण्याचा प्रयत्न करत आहे. पण, आमचे धोरण स्पष्ट आहे की, इराणकडे कधीच अण्वस्त्र असणार नाही. मग करार होऊ किंवा नाही. आम्ही ठोस पावले उचलली नाही तर इराण अण्वस्त्र तयार करु शकते. युद्ध अद्याप समाप्त झालेले नाही. आणि नवीन आव्हानं आपल्यासमोर उभी राहत आहेत", असे या समारंभात बोलताना नेतान्याहू म्हणाल्याचे इस्रायली माध्यमांनी म्हटले आहे.

इराणविरोधात संभाव्य कारवाईबाबत इराणी लष्करप्रमुख इयाल जमीर यांनी, "आमच्यापुढे अजून खूप मोठ्या कारवाया बाकी आहेत", अशी प्रतिक्रिया माध्यमांनी दिली आहे. तर, इस्रायली संरक्षण मंत्री इस्रायल काट्ज यांनी, "आम्ही पुन्हा हल्ला केल्यास, तो पूर्वीपेक्षा भीषण असेल", असे सांगितले. एकीकडे अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा चकमक सुरु झाल्याने चिंता व्यक्त केली जात असाताना आता इस्रायलने इराणला धमकी दिल्याने पुन्हा एकदा युद्ध भडकणार का? अशी भीती व्यक्त केली जात आहे.



# न्यूड सीन्स नकोच

## हुमा कुरेशी

आपल्या सशक्त अभिनयाने आणि सौंदर्याने रुपेरी पडदा व्यापणारी हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री हुमा कुरेशी सध्या जोरदार चर्चेत आहे. 'गँग ऑफ वासेपूर', 'डेढ इश्किया', 'बदलापूर' यांसारखे चित्रपट आणि ओटीटीवरील 'लीला' व 'महाराणी' या वेबसीरीजमधून तिने चित्रपटप्रेमींच्या मनात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या हुमा कुरेशी तिच्या 'बेबी डू डाई डू' या चित्रपटामुळे प्रकाशझोतात आली आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, हा चित्रपट आलिया भटच्या 'अल्फा' या चित्रपटाला तगडी टक्कर देताना दिसतोय. या सगळ्याकडे स्पर्धा म्हणून न पाहता, महिलाकेंद्रित अ‍ॅक्शनपटांसाठी हा अत्यंत सकारात्मक काळ आहे, अशी प्रतिक्रिया तिने दिली आहे. दरम्यान, याच चित्रपटाच्या निमित्ताने माध्यमाला दिलेल्या मुलाखतीमध्ये तिने ऑन-स्क्रीन न्यूड सीन्सबाबत आपली ठाम भूमिका मांडली आहे. दुसरीकडे, दाक्षिणात्य सुपरस्टार यश याचा आगामी 'टॉक्सिक' चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत असून, या चित्रपटात हुमा कुरेशी देखील एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाच्या टीझरमध्ये दाखवण्यात आलेल्या काही बोल्ड आणि इंटिमेट दृश्यांमुळे सोशल मीडियावर अनेकांनी आक्षेप घेतला होता.



# 'सैराट 2' येणार?

२०१६ साली प्रदर्शित झालेल्या 'सैराट' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करत मराठी चित्रपटसृष्टीत नवा इतिहास रचला होता. १०० कोटी रुपयांचा टप्पा पार करणारा हा पहिला मराठी चित्रपट ठरला होता. आर्ची (रिंकू राजगुरू) आणि परशा (आकाश ठोसर) यांच्या प्रेमकथेतून ग्रामीण वास्तव आणि जातीय विषमता मांडणारा हा सिनेमा प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. या चित्रपटाचा हिंदीत 'धडक' नावाचा रिमेक झाला होता. 'धडक २' नंतर आता 'सैराट २' येणार का? असा प्रश्न प्रेक्षकांना पडला असून, यावर दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी त्यांचे स्पष्ट मत मांडले आहे. हिंदीत 'धडक'चा सीक्वेल म्हणजेच 'धडक २' हा सिनेमा आल्यामुळे आता 'सैराट २' बनवणार का? या प्रश्नावर उत्तर देताना नागराज मंजुळे म्हणाले, "'धडक' सिनेमाचा सीक्वेल आलाय म्हणून 'सैराट २' आलाच पाहिजे, असं काही नाही. पण जर चांगली गोष्ट असेल, तरच 'सैराट २' येईल. 'सैराट'मध्येच ती गोष्ट पूर्णपणे संपली होती." पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, एखादा चित्रपट हिट झाला की त्या पात्रांचं पुढे काय झालं हे जाणून घेण्याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. आज मला अनेक जण 'फँड्री'च्या सीक्वेलबद्दलही विचारतात. 'सैराट' प्रदर्शित झाल्यानंतर लोक काही काळ विसरले होते, पण आता पुन्हा 'सैराट २' कधी येणार असे प्रश्न विचारत आहेत. मात्र, सध्या तरी 'सैराट २' वर कोणताही विचार केलेला नाही, असे नागराज मंजुळे यांनी स्पष्ट केले आहे.



# गुलाबी साडीत रसिका सुनीलचा जलवा

अभिनेत्री रसिका सुनील हिला 'माझ्या नवऱ्याची बायको' या मालिकेमुळे मोठी लोकप्रियता मिळाली. याशिवाय ती सोशल मीडियावरही सक्रिय असते. याद्वारे ती चाहत्यांच्या संपर्कात राहते. आता लवकरच रसिका साऊथ इंडस्ट्रीत पदार्पण करत आहे. तिच्या आगामी चित्रपटाचं नाव 'GDN' असून या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच सोहळ्यासाठी ती खास कोईंबतूरला पोहोचली होती. या कार्यक्रमात रसिकाने तिच्या स्टायलिश आणि एलिगंट लूकने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. ट्रेलर लाँच कार्यक्रमासाठी रसिकाने गुलाबी रंगाची साडी नेसली होती. त्यासोबत तिने स्लीव्हलेस डीप नेक ब्लाऊज घातला होता. मोकळे केस, हलका मेकअप आणि आकर्षक लूक यामुळे तिचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. रसिकाचा हा पारंपरिक आणि स्टायलिश अंदाज चाहत्यांच्या पसंतीस उतरला. तिचे फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून अनेकांनी तिच्या सौंदर्याचं भरभरून कौतुक केलं आहे. या कार्यक्रमातील काही खास फोटो रसिकाने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर करत लिहिले,"GDN टीमचे मनापासून आभार! एवढ्या प्रेमळ स्वागतासाठी आणि या सुंदर फोटोंसाठी तुमचे खूप धन्यवाद. आणि आता मुख्य गोष्ट... 'GDN'चा भव्य आणि शानदार ट्रेलर यूट्यूबवर प्रदर्शित झाला आहे. तुम्ही तो पाहिला का?" रसिकाच्या फोटोंवर चाहत्यांनी कमेंट करत "गुलाबी साडी आणि लाली लाल लाल", "खूपच सुंदर","मराठी इंडस्ट्रीची क्वीन", अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. सध्या तिच्या फोटोवर लाइक आणि कमेंटचा वर्षाव होत आहे.

# गोल्डन बूटसाठी काटें की टक्कर

## फिफा वर्ल्डकप २०२६; नॉर्वेचा Viking अन् इंग्लंडचा King ही रेसमध्ये

महाईन्यूज । पोर्तुगल

**फिफा वर्ल्डकप २०२६ मध्ये गोल्डन बूटची स्पर्धा तीव्र झाली आहे. आता क्वार्ट फायनल अन् सेमी फायनलमधील संघातील खेळाडू या रेसमध्ये असल्यामुळं यंदाचा गोल्डन बूट कोण घेऊन जाणार याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.**



### गोल्डन बूटच्या स्पर्धेत आघाडीवर असलेले खेळाडू

- किलियन एम्बाप्पे - ८ गोल ३ असिस्ट
- लिओनेल मेस्सी - ८ गोल १ असिस्ट
- अर्लिंग हालँड - ७ गोल ० असिस्ट
- हॅरी केन - ६ गोल १ असिस्ट
- उस्मान डेम्बेले - ५ गोल २ असिस्ट

नुकत्याच झालेल्या फ्रान्स मोरोक्को सामान्यात फ्रान्सचा स्टार खेळाडू किलियन एम्बाप्पेने एक गोल करत लिओनेल मेस्सीची बरोबरी केली. आता मेस्सी आणि एम्बाप्पेचे यंदाच्या स्पर्धेत प्रत्येकी ८ गोल झाले आहेत. अर्जेंटिना आपला पुढचा सामना हा 12 जुलै रोजी स्वित्झर्लंडसोबत होणार आहे. तिथं मेस्सीला सरशी मारण्याची संधी आहे.

मात्र या दोघांव्यतिरिक्त अजून दोन खेळाडू आहेत जे गोल्डन बूटच्या रेसमध्ये आपलं आव्हान जीवंत ठेवलं आहे. नॉर्वेचा हालँडने आतापर्यंत ७ गोल मारले आहेत. तो या यादीत सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. तर इंग्लंडचा कर्णधार हॅरी केन हा ६ गोलसह चौथ्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे जर हॅरी केनने यंदाचा गोल्डन बूट जिंकला तर तो फिफा वर्ल्डकपच्या इतिहासात दोनवेळा गोल्डन बूट जिंकणारा पहिला खेळाडू ठरणार आहे. एम्बाप्पेला देखील सलग दुसऱ्यांदा गोल्डन बूट जिंकण्याची मोठी संधी आहे.

विशेष म्हणजे हे दोन्ही खेळाडू एकमेकांविरूद्ध १२ जुलैलाच भिडणार असून या सामन्याकडे Viking vs England अशा ऐतिहासिक दृष्टीकोणातून देखील पाहिलं जात आहे. गोल्डन बूटच्या रेसमध्ये इंग्लंडचा ज्यूड वेलिंगहम आणि स्पेनचा मिकेल देखील आहेत. विशेष म्हणजे या यादीतील क्रमांक ६ पासून १० पर्यंतच्या खेळाडूंनी प्रत्येकी ४ - ४ गोल केले आहेत तर एक एक गोल असिस्ट केले आहेत.

विशेष म्हणजे फ्रान्स सलग तिसऱ्या फिफा वर्ल्डकपमध्ये सेमी फायनलमध्ये पोहचला आहे. अशी कामगिरी करणारा तो तिसरा देश झाला आहे. यापूर्वी जर्मनीने २००२ ते २०१४ पर्यंत सलग चारवेळा सेमी फायनल गाठली होती. तर ब्राझीलने १९९४ ते २००२ पर्यंत सलग तीनवेळा सेमी फायनल गाठली होती.

# यजमान इंग्लंडचा ३-० फरकाने एकतर्फी मालिकाविजय

महाईन्यूज । ब्रिस्टॉल

**कर्णधार हॅरी ब्रूक (नाबाद ७९) व फिल सॉल्ट (नाबाद ५९) यांच्या झंझावाती अर्धशतकांच्या बळावर इंग्लंडने भारतीय संघाचा चौथ्या टी-२० लढतीतही एकतर्फी धुव्वा उडविला आणि पाच सामन्यांची ही मालिका ३-० अशा फरकाने खिशात घातली. पहिला सामना पावसामुळे रद्द करावा लागल्यानंतर भारताने या मालिकेत सलग तीन पराभव पत्करले आहेत.**



### ब्रूक आणि सॉल्ट यांची धडाकेबाज फलंदाजी

मात्र, भारताच्या गोलंदाजांना इंग्लंडच्या आक्रमक फलंदाजीपुढे अपेक्षित प्रभाव पाडता आला नाही आणि सामन्यावरची पकड सुरुवातीपासूनच सुटली. हॅरी ब्रूक आणि फिल सॉल्ट यांच्या धडाकेबाज फलंदाजीमुळे इंग्लंडने भारतीय गोलंदाजांवर पूर्णपणे वर्चस्व गाजवत सामना एकतर्फी केला. या पराभवामुळे भारतीय संघाला फलंदाजीबरोबरच गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील त्रुटींवरही गंभीरपणे काम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. श्रेयस अय्यरच्या झुंजार खेळीला अन्य फलंदाजांची अपेक्षित साथ लाभली नाही.

श्रेयस अय्यरच्या नाबाद ८० धावांच्या खेळीनंतरही भारताला ७/१५८ अशा किरकोळ धावसंख्येवर समाधान मानावे लागले. प्रत्युत्तरात इंग्लंडने १३.५ षटकांत केवळ एका गड्याच्या बदल्यातच विजयाचे लक्ष्य गाठले. हॅरी ब्रुकने ३५ चेंडूंत ८ चौकार व ४ षटकारांसह नाबाद ७९ धावा चोपल्या. तर सॉल्टने ४२ चेंडूंत ५९ धावांची आतषबाजी केली. यादरम्यान, हॅरी ब्रूकचा स्ट्राईकरेट २२५.७१ असा राहिला.

प्रारंभी, कर्णधार श्रेयस अय्यरने एकहाती डाव सावरत ४९ चेंडूंमध्ये नाबाद ८० धावांची वादळी खेळी खेळली आणि याचमुळे इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात भारताला २० षटकांत ७ बाद १५८ धावांपर्यंत मजल मारता आली. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, खराब प्रारंभाचा संघाला फटका बसला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी 'शॉर्ट बॉल' रणनीतीचा अचूक वापर करत भारताच्या सलामीवीरांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी १० चेंडूंत १५ धावांवर जोफ्रा आर्चरचा बळी ठरला, तर इशान किशन केवळ ४ धावांवर जोश टंगच्या गोलंदाजीवर बाद झाला. दोन झटके बसल्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यर आणि शिवम दुबे यांनी चौथ्या गड्यासाठी ५३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. शिवम दुबेने २३ चेंडूंत २२ धावांचे योगदान दिले.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 11 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ई-निविदा न काढता काम वाटप केल्याचा दावा | ५० ते ५५ कोटींच्या कमिशनचाही गंभीर आरोप

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत शालेय साहित्य खरेदीत ४०० कोटींचा घोटाळा?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**


**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील शालेय साहित्य खरेदी व्यवहारात सुमारे ४०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते व राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणात ई-निविदा प्रक्रिया न राबवता सोलापूर येथील एका सहकारी संस्थेला कोट्यवधी रुपयांचे काम देण्यात आल्याचा दावा करत संबंधित मंत्री आणि महापालिका प्रशासनाविरोधात कारवाईची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

राऊत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर शेअर केलेल्या पत्रानुसार, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील काही नगरसेवकांनी त्यांची भेट घेऊन या कथित गैरव्यवहाराची माहिती दिली. प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश, ओढणी, स्वेटर, मोजे, रेनकोट, दप्तर आदी साहित्याची खरेदी ई-निविदा प्रक्रियेशिवाय करण्यात आल्यामुळे महापालिकेच्या निधीची मोठ्या प्रमाणात लूट झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

राऊत यांच्या म्हणण्यानुसार, ई-निविदा प्रक्रिया डावलून सोलापूर येथील 'जगदंबा रेडिमेड ड्रेसेस सहकारी संस्था'ला थेट काम देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी शालेय साहित्याचा दर २३९ रुपये निश्चित केला असताना महापालिकेने त्याच साहित्याची खरेदी ८१४ रुपये प्रति संच दराने केल्याचा दावा त्यांनी केला आहे. प्रति संच ५७५ रुपयांचा फरक असल्याने या व्यवहारातून सुमारे ४०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे.

याशिवाय, निविदा प्रक्रिया टाळून संबंधित संस्थेला काम मिळावे यासाठी मंत्रिमंडळातील एका वरिष्ठ मंत्र्याने महापालिका आयुक्तांवर दबाव आणल्याचा आरोपही राऊत यांनी केला आहे. या व्यवहारातील कमिशनपोटी ५० ते ५५ कोटी रुपयांची रक्कम संबंधित मंत्र्यांपर्यंत पोहोचल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मंत्री आणि महापालिका प्रशासनावर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे.


सत्यमेव जयते

संजय राऊत
खासदार (राज्यसभा)

९ जुलै २०२६

प्रति,
मा. श्री. देवेंद्र फडणवीसजी

जय महाराष्ट्र!

विषय : पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतील गणवेश शालेय साहित्य खरेदी व्यवहारात झालेल्या कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराबाबत.

पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतील काही नगरसेवक मला भेटले. प्राथमिक-माध्यमिक शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, ओढणी, शालेय स्वेटर, मोजे, रेनकोट, दप्तरे वगैरे खरेदी ही नियमानुसार 'ई टेंडर'द्वारे झाली नाही. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीची लूट झाल्याची त्यांची भावना आहे.

नियमानुसार निविदा प्रक्रियेत 'खरेदी' किंमत ३ लाखांपेक्षा जास्त असेल तेव्हा 'ई निविदा' प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे, पण सोलापूरच्या जगदंबा रेडिमेड ड्रेसेस सहकारी संस्थेला परस्पर कोट्यवधीचे काम देऊन नियमाचा भंग केला असे या प्रकरणात दिसते.

या भ्रष्टाचाराचे प्रकरण सुप्रीम कोर्टात पोहोचले. माननीय सुप्रीम कोर्टाने शालेय साहित्याचा दर ठरवून दिला तो प्रति 'रु.२३९' प्रमाणे. तरीही महापालिकेने सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शक तत्त्वांना हरताळ फासला. रुपये '८१४' प्रमाणे हे काम संबंधित संस्थेला दिले व त्यामुळे '५७५' रुपये ही तफावत म्हणजे जनतेच्या तिजोरीची लूट आहे. या कोट्यवधींच्या खरेदीसाठा कोणतीही टेंडर प्रक्रिया राबवली नाही हे धक्कादायक आहे. अशा पद्धतीने या व्यवहारात साधारण चारशे कोटी रुपयांची लूट झाली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय, 'न खाऊंगा, न खाने दूंगा' पंतप्रधान मोदी यांचे घोषवाक्य प्रेरणादायी आहे, पण पिंपरी-चिंचवड पालिकेतील गणवेश, शालेय साहित्य खरेदीचे काम निविदेशिवाय नियमबाह्य पद्धतीने संबंधित संस्थेला मिळावे यासाठी आपल्या मंत्रिमंडळातील एका वरिष्ठ मंत्र्याने पालिका आयुक्तांवर दबाव आणला. हा दबाव काही धर्मादाय किंवा सामाजिक कार्यासाठी नक्कीच आणला नाही. यातील मोठी टक्केवारी मंत्र्यांकडे पोहोचली व हा आकडा साधारण ५०-५५ कोटींचा आहे. विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्य व्यवहारातील असा भ्रष्टाचार होणे लज्जास्पद आहे.

सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शन तत्त्वांना पायदळी तुडवून झालेला हा भ्रष्टाचार आपणास मान्य नसेल तर संबंधित मंत्री व पालिका प्रशासनावर त्वरित कारवाईचे आदेश द्यावेत ही विनंती. या भ्रष्ट व्यवहाराचे सर्व कागदोपत्री पुरावे आजच आपल्या कार्यालयाकडे पाठविले आहेत.

कळावे,

आपला नम्र,
(संजय राऊत)

श्री. देवेंद्र फडणवीसजी
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

मुंबई : मैत्री बंगलो, फ्रेन्डस कॉलनी, भांडुप (पूर्व), मुंबई - ४०० ०४२. दूरध्वनी : ०२२-२५९३ ३६३६, फॅक्स : ०२२-२५९२ ३६३६
कार्यालय : दै. सामना सद्गुरू दर्शन, नागू सयाजी वाडी, दै. सामना मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी : ०२२-१४३७ ०५९१, फॅक्स : ०२२-२४३६ ५३०८, ई-मेल : s.raut@sansd.nic.in
दिल्ली : ११, फिरोजशहा रोड, नवी दिल्ली - ११० ००१. दूरध्वनी : ०११-२३३८ २९९९. फॅक्स : २३३८ २०००



## ४०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

"भ्रष्टाचाराचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर न्यायालयाने शालेय साहित्याचा दर २३९ रु. प्रमाणे ठरवून दिला होता, पण महापालिकेने कोर्टाच्या मार्गदर्शक तत्त्वांना हरताळ फासला", असा आरोप त्यांनी केला. "सोलापूरच्या संस्थेला निविदा प्रक्रिया न राबविता ८१४ रु. प्रमाणे हे काम देण्यात आले त्यामुळे ५७५ रुपयांची तफावत दिसून येते. अशा प्रकारे या व्यवहारत ४०० कोटी रुपयांची लूट झाली आहे", असा आरोप राऊत यांनी केला.



## शालेय साहित्य खरेदीत भ्रष्टाचार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील काही नगरसेवकांनी भेट घेऊन या गैरव्यवहाराबाबत माहिती दिल्याचे संजय राऊतांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन शेअर केलेल्या पत्रात म्हटले आहे. "प्राथमिक – माध्यमिक शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, ओढणी, शालेय स्वेटर, मोजे, रेनकोट, दप्तरे इ. वस्तूंची खरेदी ई-निविदाद्वारे झाली नाही, त्यामुळे पालिकेच्या तिजोरीत लूट झाल्याची भावना नगरसेवकांनी व्यक्त केली", असे राऊतांनी पत्रात म्हटले आहे. "ई-निविदा प्रणाली न राबवता सोलापूरच्या जगदंबा रेडिमेड ड्रेसेस सहकारी संस्थेला परस्पर कोट्यवधीचे काम देऊन नियमांचा भंग केल्याचे या प्रकरणात दिसते", असे राऊत म्हणतात.



## मंत्र्याचा आयुक्तांवर दबावाचा आरोप

निविदेशिवाय नियमबाह्य पद्धतीने या संबंधित संस्थेला काम मिळावे यासाठी मंत्रिमंडळातील एका वरिष्ठ मंत्र्याने पालिका आयुक्तांवर दबाव आणल्याचा आरोपही पत्रातून केला आहे. एवढेच तर यातील टक्केवारी मंत्र्यांकडे पोहोचली असून, हा आकडा ५०-५५ कोटी आहे, असा दावा त्यांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित मंत्री आणि पालिका प्रशासनावर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती संजय राऊतांनी पत्रातून केली आहे.

# कचरा डेपो दुर्घटनेनंतर बचाव मोहिमेला गती

## इमारतीत प्रवेशासाठी सुरक्षित मार्ग तयार करण्याचे काम युद्धपातळीवर

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मोशी कचरा डेपो येथील दुर्घटनाग्रस्त इमारतीभोवती साचलेला मोठ्या प्रमाणातील मलबा हटवून इमारतीत सुरक्षित प्रवेशमार्ग तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, अतिरिक्त यंत्रसामग्रीच्या मदतीने बचाव मोहिमेला गती देण्यात आली आहे. इमारतीत अडकलेल्या सुमारे आठ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि महापालिका प्रशासनाकडून समन्वयाने प्रयत्न सुरू आहेत.**




दुर्घटनास्थळी सध्या इमारतीचा अस्थिर भाग स्थिर करण्याबरोबरच बाजूचा मलबा हटविण्याचे काम जेसीबी, पोकलेन आणि डंपरच्या सहाय्याने सुरू आहे. बचाव पथके अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अत्यंत काळजीपूर्वक कारवाई करत आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विजयकुमार चौबे आणि एनडीआरएफचे कमांडंट प्रवीण धट्ट यांनी घटनास्थळी पाहणी करून बचावकार्याचा आढावा घेतला. प्रत्यक्ष परिस्थिती, इमारतीची सद्यस्थिती आणि संभाव्य धोके लक्षात घेऊन पुढील बचाव मोहिमेची रणनीती निश्चित करण्यात आली.

दुर्घटनेला ४५ तासांहून अधिक कालावधी उलटला असून, अडकलेल्या नागरिकांपर्यंत शक्य तितक्या लवकर पोहोचण्यासाठी सर्व आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ कार्यरत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. सर्व संबंधित यंत्रणांना बचावकार्य अधिक वेगाने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. इमारतीच्या समोरील बाजूने प्रवेशाचा मार्ग पूर्णपणे बंद झाल्याने मागील बाजूने सुरक्षित प्रवेशमार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे. यापूर्वी सुखरूप बाहेर काढण्यात आलेल्या नागरिकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आत अडकलेल्या व्यक्तींचे संभाव्य स्थान निश्चित करण्यात आले असून, त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आल्याची माहिती एनडीआरएफचे कमांडंट प्रवीण धट्ट यांनी दिली.

### प्रकाश आंबेडकर यांची घटनास्थळी भेट

दरम्यान, माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या बचावकार्याचा आढावा घेतला. त्यांनी महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडून दुर्घटनेची आणि बचाव मोहिमेची सविस्तर माहिती घेतली. अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### महापौरांनी नातेवाईकांना दिला धीर

महापौर रवि लांडगे यांनीही घटनास्थळी पाहणी करून दुर्घटनाग्रस्त इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद साधला. बचावकार्य समन्वयाने आणि अत्यंत दक्षतेने सुरू असून प्रत्येक अडकलेल्या व्यक्तीपर्यंत सुरक्षितरीत्या पोहोचण्यासाठी सर्व यंत्रणा प्रयत्नशील असल्याची माहिती त्यांनी नातेवाईकांना दिली. तसेच प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नागरी समस्यांबाबत डॉ. सुहास कांबळे यांचा पाहणी दौरा

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक ८ मधील बालाजीनगर परिसरात गेल्या आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या विविध नागरी समस्यांची दखल घेत नगरसेवक तथा शहर सुधारणा समिती सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी दौरा केला.**





"नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित कोणतीही समस्या प्रलंबित राहू देणार नाही. सुदैवाने पावसाने आता उघडीप घेतली असल्याने पावसामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे. नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि मूलभूत सुविधांनी युक्त परिसर उपलब्ध करून देणे हेच आमचे प्राधान्य आहे."

**- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, शहर सुधारणा समिती सदस्य, पिं. चिं. मनपा.**

यावेळी परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचणे, अंतर्गत गटारे तुंबणे, ड्रेनेज लाईनची समस्या, नाल्यांमधील अडथळे, स्वच्छतेचा प्रश्न तसेच पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी निर्माण झाल्या होत्या. या सर्व समस्यांची डॉ. कांबळे यांनी अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करत प्रत्येक ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले.

यावेळी महापालिकेचे कार्यकारी अभियंता सुनील नरोटे, उपअभियंता बाळासाहेब शेटे, सहकारी रिंकू पिटेकर, विठ्ठल शिंदे तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी परिसरातील विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. त्यावर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करून प्रलंबित कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची भूमिका मांडली.

पाहणीदरम्यान अंतर्गत गटारे, ड्रेनेज लाईन, सार्वजनिक स्वच्छतागृहे, नाल्यांची स्थिती तसेच ज्या भागात सातत्याने पावसाचे पाणी साचते अशा ठिकाणांची सविस्तर पाहणी करण्यात आली. या समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्याचे निर्देश डॉ. कांबळे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी कार्यकारी अभियंता सुनील नरोटे यांनी बालाजीनगर परिसरातील प्रलंबित नागरी कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील तसेच पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी महापालिकेकडून आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# महापालिकेची पालखी मार्गावर स्वच्छता मोहीम

## पालखी सोहळ्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील संपूर्ण पालखी मार्गाची स्वच्छता

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील संपूर्ण पालखी मार्गाची स्वच्छता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने नियोजनबद्ध आणि युद्धपातळीवर राबविलेल्या मोहिमेतून पूर्ण केली. पालखीचे शहरात आगमन होण्यापूर्वी तसेच प्रस्थानानंतर अवघ्या दोन तासांत पालखी मार्ग आणि परिसराची संपूर्ण स्वच्छता करून शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्ववत करण्यात आली.**



### ‘स्वच्छ वारी, सुंदर वारी’

उपआयुक्त (आरोग्य) डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, “पालखी सोहळ्यादरम्यान स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्यात आला होता. पालखी मार्गावर तैनात स्वच्छता पथके, तात्पुरत्या स्वच्छतागृहांची नियमित देखभाल, निर्जंतुकीकरण आणि त्वरित कचरा उचल यामुळे वारकरी बांधवांना स्वच्छ व आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देता आल्या. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्थांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.” वारीनंतर पालखी मार्ग आणि परिसराची तातडीने स्वच्छता करून शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्ववत करण्यात आली. या उपक्रमातून महापालिकेने ‘स्वच्छ वारी, सुंदर वारी’ हा संदेश प्रभावीपणे दिला.

वारीदरम्यान शहरात मोठ्या संख्येने येणाऱ्या वारकरी बांधवांच्या सुविधा आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पालखी मार्गावर तात्पुरती स्वच्छतागृहे, स्नानगृहे तसेच आवश्यक स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सुविधांची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि देखभाल आरोग्य विभागामार्फत करण्यात आल्या होत्या.

या मोहिमेत महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सलग काम करत पालखी मार्ग स्वच्छ ठेवला. विविध स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महापालिकेच्या प्रयत्नांना बळ दिले. सीवायडीए, बिसलेरी, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल गव्हर्नमेंट, संस्कार प्रतिष्ठान, ईसीए, प्रतिभा कॉलेज, संजीवनी स्वयंसेवी संस्था, अंकुश फाऊंडेशन, ज्ञानगंगा फाऊंडेशन, अल्फा फाऊंडेशन, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, म्हाळसाकांत विद्यालय, ह्यूमन राईट्स असोसिएशन, संत निरंकारी मंडळ, निर्मल वारी, यशस्वी ग्रुप, आरंभ महिला बचत गट, यशोधरा महिला बचत गट, पिंची संस्था, निर्मल फ्लॉवर फाऊंडेशन, लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन, उमंग फाऊंडेशन, गुणवंत कामगार मंडळ, पितृछाया ट्रस्ट आणि एस.एन.बी.पी. कॉलेज आदी संस्थांनी या मोहिमेत सहकार्य केले.

याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे म्हणाले, “वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. वारकरी बांधवांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेने सर्व यंत्रणा कार्यरत ठेवली. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त सहभागातून स्वच्छ वारीचा आदर्श निर्माण झाला.” महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, “पालखी मार्गावरील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, निर्जंतुकीकरण आणि तात्पुरत्या स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.”

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी, आयुक्तांची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा डोंगर इमारतीवर पडल्याने झालेली दुर्घटना ही नैसर्गिक आपत्तीच आहे. मात्र, इमारतीचे स्ट्रक्चर, कचरा डेपो आणि इमारतीमध्ये अंतर योग्य होते का, या सगळ्यांची बचाव कार्यसंपल्यानंतर त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी केली जाईल. यात कोणी दोषी असेल, तर त्यांच्यावर निश्चित कारवाई होईल, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.**



### बचावकार्य सुरुच

महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोतील कचऱ्याचा डोंगर पडून तीन मजली इमारत कोसळल्याने कचऱ्याखाली अद्यापही आठ कामगार दबले आहेत. त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रशासनाकडून बचावकार्य सुरू आहे. २४ तासांहून अधिक काळ बचाव कार्य राबवून नऊ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले तर, गुरुवारी एका कामगाराचा मृतदेही हाती लागला. दुर्घटनेत अडकलेल्या १८ कामगारांच्या सुटकेसाठी लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), महापालिकेचा अग्निशमन दल आणि पोलिसांच्या मदतीने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले.

दुसरीकडे शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नगरसेवकांनी या घटनेच्या निषेधार्थ महापालिका मुख्यालयातील आयुक्त दालनात आंदोलन सुरु केले आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, आठ जुलै रोजी दुपारी अडीच वाजल्यापासून शोधकार्य राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यात बराच वेळ गेला आहे. त्रयस्थ व्यक्तींना शोधकार्य मंदावले असल्याचे वाटत आहे. परंतु, शोधकार्य मंदावले नाही. कठीण शोधकार्य आहे. कोसळलेल्या इमारतीमधील छोट्या खोलीत (पॅन्ट्री) आठ लोक अडकले आहेत. त्यासाठी कचरा बाजूला करावा लागत आहे.

आता इमारत खोलली जाणार आहे. त्यातून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नातेवाईकांची भावना समजू शकतो. नातेवाईकांना धीर दिला आहे. १२ मशीनच्या माध्यमातून कचरा हटविला जात आहे. नवीन दहा मशीन आणल्या आहेत. परिस्थितीनुसार बचावकार्य राबविण्यात येत आहे. पहिला आणि दुसऱ्या मजल्यावरील दोन्ही स्लॅप एक झाले आहे. बचावकार्य अतिशय कठिण झाले आहे. येथे कचरा असल्याने मिथेन गॅस तयार होत आहे. त्यामुळे अडचण येत आहे.

पोलीस उपायुक्त मारुती जगताप म्हणाले, या घटनेत एकाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास सुरु आहे. त्यासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. ईडीआरनुसार तपास सुरु असून कोण दोषी आढळले, तर गुन्हा दाखल केला जाईल.

या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसेविका सुलभा उबाळे, ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे, नगरसेवक नीलेश तरस आंदोलनात सहभागी झाले आहेत. प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली जात आहे.

बुधवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत सहा कामगारांना सुखरुप बाहेर काढण्यात जवानांना यश आले. गुरूवारी मध्यरात्री दीड वाजेपर्यंत विजय सपकाळ, भूषण पाटील आणि महेश राऊत या तीन कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास भावेश वाणी यांचा मृतदेह हाती लागला. अद्यापही आठ कामगार कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.

# D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX AKURDI, PUNE

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

43 Years of Excellence in Education

## Your Pathway to Leadership Begins at D Y PATIL

## ADMISSIONS OPEN 2026-27

### Our Institutes

**COLLEGE OF ENGINEERING** (AUTONOMOUS)
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & **NBA** NRI Quota Available
UC- Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A
PG- Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A
PhD- Mech / ENTC / Civil

**INSTITUTE OF MCA & MANAGEMENT**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Affiliated to SPPU
MCA / MBA / PhD (Management)

**COLLEGE OF ARCHITECTURE**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Approved by COA
B.Arch / M.Arch (Construction Management) / D.Arch

**PGDM INSTITUTE**
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
NRI Quota Avaliable
Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics & Business Analytics with AI / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management

**COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT**
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
BSc (Hons) Agri Business Management

**COLLEGE OF PHARMACY**
Accredited by **NBA** & **NAAC** with **'A+'** Grade
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
D.Pharm / B.Pharm / Pharm D. / M.Pharm (Pharmaceutics) / M.Pharm (Pharmaceutical Quality Assurance) / M.Pharm (Pharmaceutical Chemistry) / M.Pharm (Pharmacology) / M.Pharm (Regulatory Affairs) / M.Pharm (Phytopharmacy & Phytomedicine)

**INSTITUTE OF PHARMACY**
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
D.Pharm

**Y B PATIL POLYTECHNIC**
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
(Accredited by **NBA**)
Diploma in Civil / Mech / Comp / E&C

### Why Choose Us?

- Green & Modern Campus
- Smart Classrooms & Digital Learning
- Experienced Faculty & Excellence
- Global University Collaborations
- Wi-Fi Campus & Modern Facilities
- Sports, Cafeteria & Auditorium
- Safe & Disciplined Environment
- International Academic Tours
- Modern Boys & Girls Hostels
- DYP Dnyansagar Incubation Foundation



**Address:** Sector No. 29, Nigdi Pradhikaran, Akurdi, Pune 411044, Maharashtra, India
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
**9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999**

REGISTER HERE